WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM



दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | मंगळवार , 22 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 131 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

## अमली पदार्थांच्या विळख्यातून बीडला मुक्त करणार; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा कठोर पवित्रा!

■ बीड प्रतिनिधी

जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वाढत्या वापराला आळा घालण्यासाठी आणि क्षेत्रीय स्तरावरील ही समस्या समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अमली पदार्थ प्रतिबंधात्मक समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय यंत्रणेला अमली पदार्थांच्या विरोधात १०० टक्के कडक कारवाया करण्याचे आदेश दिले असून, व्यसनमुक्तीसाठी संबंधित यंत्रणेने आता पूर्णपणे 'ॲक्शन मोड' वर येणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.

बैठकीच्या सुरुवातीला बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी 'कोटपा' (COTPA) कायद्यांतर्गत जिल्ह्यात जास्तीत जास्त कारवाया करून अमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्याच्या सूचना दिल्या. विशेषतः माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

मुख्याध्यापक आणि शिक्षणाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची

शासन निर्णयाचा संदर्भ देत जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, १० जुलै २०२३ च्या आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी आणि मुख्याध्यापकांना अमली पदार्थ तसेच तंबाखू विरोधी कारवाया करण्याचे अधिकार व सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता केवळ प्रशासनावर भिस्त न ठेवता, मुख्याध्यापकांनीदेखील या समाजसुधारणेच्या कामात हिरिरीने पुढे यावे. विद्यार्थ्यांना व्यसनाधीन बनवणाऱ्या प्रत्येक समाजकंटकाविरुद्ध एकजूट होऊन सक्त कायदेशीर कारवाया करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

अमली पदार्थांचे सेवन तरुण पिढीला उद्ध्वस्त करत असून, याला वेळीच वेसण घालण्यासाठी पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभागाने समन्वय साधून संयुक्त मोहीम राबवावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या बैठकीत केले.



- **कठोर कारवायांचे आदेश:** शाळा आणि महाविद्यालयीन परिसरामध्ये अमली पदार्थांच्या विरोधात १०० टक्के कडक कारवाया करण्याचे यंत्रणेला स्पष्ट निर्देश.
- **COTPA अंतर्गत कारवाई:** कोटपा (COTPA) कायद्याचे कठोर पालन करून जास्तीत जास्त तंबाखूजन्य व अमली पदार्थ जप्त करण्यावर भर.
- **शैक्षणिक संस्थांचा सहभाग:** शासन निर्णयानुसार मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुखांवर अमली पदार्थ विरोधी कारवायांची मोठी जबाबदारी.
- **जनजागृती आणि ॲक्शन मोड:** शाळांमध्ये विशेष जनजागृती मोहीम राबवून संशयितांवर व समाजकंटकांवर कायदेशीर बडगा उगारण्याचे निर्देश.

## काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा युवक काँग्रेसच्या वतीने सत्कार

■ परळी वैजनाथ :

बीड जिल्हा काँग्रेस कमिटी, परळी शहर काँग्रेस व तालुका काँग्रेसच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा युवक काँग्रेसच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच युवक काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी बाळासाहेब गित्ते, तर शहराध्यक्षपदी रसूल खान यांची निवड करण्यात आली. या निवडीचे नियुक्तीपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी प्रकाशराव देशमुख व बहादूरभाई, तर सरचिटणीसपदी इतशाम खतीब व विश्वनाथ गायकवाड यांची निवड झाली आहे. परळी शहर काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी वैजनाथ गाडेकर, चांद मेहबूब व शेख जावेद, तर सरचिटणीसपदी दीपक सिरसाट यांची निवड करण्यात आली. तसेच तालुका काँग्रेसमध्ये तांदळे साहेब यांची सरचिटणीसपदी निवड झाल्याबद्दल युवक काँग्रेसच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रकाशराव देशमुख यांच्या निवासस्थानी युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी युवक काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी बाळासाहेब गित्ते आणि शहराध्यक्षपदी रसूल खान यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली. त्यांना ॲड. अनिल मुंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी प्रकाशराव देशमुख, विश्वनाथ गायकवाड व बहादूरभाई यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमास ॲड. अनिल मुंडे, प्रकाशराव देशमुख, बहादूरभाई, विश्वनाथ गायकवाड, शशी चौधरी, इतशाम खतीब, सुभाष देशमुख, वैजनाथ गाडेकर, शेख जावेद, चांद मेहबूब, दीपक सिरसाट, रणजित देशमुख, तांदळे साहेब, गुलाबराव देवकर, फरकुंद अली बेग, मुरकुटे, गित्ते साहेब, रसूल खान, बाळासाहेब गित्ते, बब्बूभाई नगरसेवक, अनंत देशमुख आदी उपस्थित होते.

## परळी फेस्टिवलच्या गणरायाची प्रदीप मुंडे यांच्या हस्ते आरती संपन्न

■ परळी प्रतिनिधी :

परळी फेस्टिवलच्या गणरायाची आरती जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात प्रदीप मुंडे यांच्या हस्ते संपन्न झाली. यावेळी त्यांच्या पत्नी शिल्पा प्रदीप मुंडे, नंदिनी प्रदीप मुंडे तसेच प्रतापराजे प्रदीप मुंडे उपस्थित होते. गणरायाच्या आरतीनिमित्त उपस्थित भाविकांनी भक्तिभावाने श्री गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी श्रीच्या चरणी दुष्काळाचे सावट दूर करून पाऊस पडू दे अशी प्रार्थना केली. या कार्यक्रमास जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. मुंडे, प्रा. संदिपान मुंडे, नागनाथ मुंडे, बाळासाहेब बनसोडे यांच्यासह मान्यवर व गणेशभक्त उपस्थित होते.



## परळीच्या पाणी पुरवठ्यासाठी प्रत्यक्ष आढावा; नागापूर जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी

### नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्री गित्ते, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नगर परिषद पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी जलशुद्धीकरण प्रकल्पाची केली पाहणी

■ परळी वैजनाथ (प्रतीनिधी)

शहरातील पाणी पुरवठ्याच्या सद्यस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्री रविंद्र गित्ते, नगर परिषद पदाधिकारी, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे व अधिकाऱ्यांनी नागापूर येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी उपलब्ध जलसाठा, जलशुद्धीकरण प्रक्रिया आणि पाणीपुरवठा यंत्रणेची सविस्तर पाहणी करण्यात आली.

यावेळी प्रकल्पातील ब्लिचिंग व तुरटीचा उपलब्ध साठा, जलशुद्धीकरणाची सद्यस्थिती तसेच जुना प्लॅन्ट आता अकार्यक्षम झाल्याने त्याचीही पाहणी करण्यात आली. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरील एअर वॉल्व्हची स्थिती देखील तपासण्यात आली.तसेच प्रकल्प परिसरातील कर्मचारी निवासस्थानांचीही पाहणी करण्यात आली.

**आवश्यक पाणी कपातीचा निर्णय घेणे गरजेचे....**

**■ सध्या प्रकल्पात केवळ २० टक्के पाणीसाठा असून त्यापैकी अंदाजे १५ टक्केच पाणी उपयुक्त साठा आहे. विशेष म्हणजे अद्यापही वाण नदीला समाधानकारक पाणी आलेले नाही.या अत्यंत गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी लवकरच आवश्यक पाणी कपातीचा निर्णय घेणे गरजेचे असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.**

निवासस्थानांची झालेली दुरवस्था पाहता आवश्यक दुरुस्ती व देखभालीबाबत यावेळी आढावा घेण्यात आला. सध्या प्रकल्पात केवळ २० टक्के पाणीसाठा असून त्यापैकी अंदाजे १५ टक्केच पाणी उपयुक्त साठा आहे. विशेष म्हणजे अद्यापही वाण नदीला समाधानकारक पाणी आलेले नाही.या अत्यंत गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करून प्रत्येक थेंबाचा योग्य वापर करण्याची गरज आहे.

दरम्यान, उपलब्ध पाणीसाठा अत्यंत मर्यादित असताना अनधिकृत पाणीउपशावर प्रभावी कारवाई होत नसल्याबद्दल पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी नाराजी व्यक्त केली. परळी शहराच्या हक्काच्या पाण्याचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस व कठोर पावले उचलावीत, अशी स्पष्ट भूमिका यावेळी मांडण्यात आली.पाण्याचे काटेकोर नियोजन आवश्यक आहे. नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू आहेत. नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रत्येक थेंब जपण्यासाठी नगर परिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.



यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्री रविंद्र (पापा) गित्ते, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, गटनेते वैजनाथ सोळंके, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, राजाभैय्या पांडे, माजी उपनगराध्यक्ष रविंद्र परदेशी व माजी नगरसेवक रमेश चौडे, शिवसेना युवक नेते रवींद्र गित्ते, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे, पाणी पुरवठा विभाग मधील संदीप समुद्रे, नागनाथ सोळंके आदी उपस्थित होते.



# आष्टीत नियमावलीच्या कचाट्यात बाप्पा; भक्तांच्या उत्साहावर प्रशासनाचे पाणी!

## गणेशोत्सवाच्या जल्लोषावर नियमांचे ओझे; मंडळे, कार्यकर्ते आणि भक्तांमध्ये नाराजी

■ आष्टी (प्रतिनिधी) :

राज्यासह देशभरात गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचलेला असताना आष्टीत मात्र गणेशोत्सवाच्या जल्लोषावर नियमावलीचे सावट पडल्याची भावना गणेशभक्तांमधून व्यक्त होत आहे. गणेश मंडळांना विविध परवानग्या, अटी-शर्ती आणि प्रशासनाच्या सूचनांच्या फेऱ्यात अडकवले जात असल्याने उत्सव साजरा करायचा की कागदपत्रांची पूर्तता करायची, असा सवाल मंडळांच्या कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जात आहे.

आष्टी शहर आणि तालुक्यात गणेशोत्सवाला मोठी परंपरा असून विविध मंडळांकडून दरवर्षी सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. गणरायाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत ढोल-ताशांचा गजर, बेंजो पथके आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे आष्टीचे वातावरण भक्तिमय आणि उत्साहपूर्ण होत असते. यंदा मात्र नियमांच्या अंमलबजावणीमुळे या उत्साहाला मर्यादा येत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

प्रशासनाने कायदा-सुव्यवस्था आणि ध्वनी प्रदूषणासंदर्भातील नियमांचे पालन करणे आवश्यक असले, तरी नियमांची अंमलबजावणी करताना स्थानिक परिस्थिती आणि गणेश मंडळांच्या भावना यांचाही विचार होणे गरजेचे असते. नियम सर्वांसाठी समान असावेत, त्यांची माहिती आधीच स्पष्टपणे देण्यात यावी आणि परवानग्यांच्या प्रक्रियेत अनावश्यक किचकटपणा टाळता आला असता असे मत मंडळांकडून व्यक्त होत आहे.

एकीकडे राज्यभर गणेशोत्सवासाठी प्रशासन आणि गणेश मंडळांमध्ये समन्वय साधून यामध्ये उत्साह वाढविण्याचे काम केले.मात्र आष्टीत मात्र नियम, परवानग्या आणि पोलिसांच्या सूचनांचा बोजा भक्तांच्या उत्साहावर पडत असल्याची भावना निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबत गणेश मंडळे आणि सामाजिक संघटनांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.बाप्पांचा उत्सव हा भक्ती, परंपरा आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव आहे.मात्र नियमांच्या नावाखाली उत्सवाची गळचेपी होऊ नये, अशी अपेक्षा आष्टीतील गणेशभक्त व्यक्त करत आहेत.

देशातील सर्वच शहरात गणेशोत्सवाचे महत्त्व अधोरेखित करताना स्थानिक प्रशासनाने गणेशभक्तांच्या भावना आणि परंपरांचा विचार करून डीजे, बँजो तसेच पारंपरिक वाद्यांना नियमांच्या चौकटीत परवानगी दिल्याचे चित्र आहे. मग बीड जिल्हा आणि विशेषतः आष्टी तालुका नेमका देशाच्या नकाशावर आहे की नाही, असा संतप्त सवाल आता गणेश मंडळांकडून उपस्थित केला जात आहे.

देशात सर्वत्र भक्तांच्या भावनांचा सन्मान आणि आष्टीत मात्र नियमांचा बडगा, असा दुजाभाव का? नियम असतील तर ते सर्वांसाठी समान असावेत, अशी मागणी गणेश मंडळांकडून होत आहे.



# ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतले पुण्यातील मानाच्या पांच गणपतीसह विविध गणेशांचे दर्शन

## ठिक ठिकाणी केली आरती ; गणेश मंडळाच्या वतीने झाले जंगी स्वागत

■ पुणे वृत्तसंस्था

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शहरातील मानाच्या पांच गणपतीसह विविध गणेशांचे दर्शन घेतले. ठिक ठिकाणी त्यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. गणेश मंडळाच्या वतीने यावेळी त्यांचं जंगी स्वागत करण्यात आलं.

पुण्यातील गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरात लोकप्रिय आहे. गणेशाच्या भव्य दिव्य मुर्तींचे तसेच देखाव्यांचे याठिकाणी आकर्षण असते. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे ना. पंकजाताई मुंडे यांनी आजच्या पुणे दौ-यात सायंकाळी मानाच्या पांच गणपतीपैकी पहिल्या कसबा पेठेतील गणपतीचे दर्शन घेऊन आरती केली. त्यानंतर तांबडी जोगेश्वरी, केसरीवाडा, गुरूजी तालीम मंडळ, तुळशीबाग, भाऊसाहेब रंगारी, दगडूसेठ हलवाई, केसरीवाडा, साने गुरूजी तरूण मंडळ आदी गणेश मंडळांना भेटी देवून श्रींची आरती केली. राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, सदाशिव खाडे, धिरज घाटे, अशोक मुंडे व कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरात आगमन होताच ना. पंकजाताई मुंडे यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठिक ठिकाणी जोरदार स्वागत केले.

# उमरीत मुरूम चोरीवर LCBचा दणका!

## दोन हायवा जप्त; तब्बल ७० लाख १६ हजारांचा मुद्देमाल ताब्यात

■ परभणी : प्रतिनिधी

अवैध गौण खनिजाच्या वाहतुकीविरोधात परभणी स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत उमरी परिसरात एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या कारवाया केल्या. या कारवाईत मुरूमाची विनापरवाना वाहतूक करणारे दोन हायवा टिप्पर जप्त करण्यात आले असून, एकूण ७० लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि अपर पोलीस अधीक्षक तानाजी चिखले यांच्या आदेशाने तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध गौण खनिजाविरोधात मोहीम सुरू आहे.

या मोहिमेंतर्गत २१ सप्टेंबर रोजी LCB पथकाने उमरी परिसरात दोन कारवाया केल्या.

पहिल्या कारवाईत उमरी गावाकडून परभणीकडे येणाऱ्या रस्त्यावर एका हायवा टिप्परमधून विनापरवाना मुरूमाची वाहतूक होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या कारवाईत MH-46-AR-9500 क्रमांकाचा हायवा टिप्पर, किंमत ३५ लाख ८ हजार रुपये, जप्त करण्यात आला. याप्रकरणी सय्यद फेरोज सय्यद शब्बीर, रा. बोरवंड खुर्द, ता. जि. परभणी याच्यासह हायवा मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत उमरी येथील मातोश्री किराणा दुकानासमोर MH-24-AU-8500 क्रमांकाचा आणखी एक हायवा टिप्पर पोलिसांनी पकडला. या वाहनाची किंमतही ३५ लाख ८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. याप्रकरणी शेख रहीम शेख साहेबलाल, रा. बोरवंड खुर्द, ता. जि. परभणी याच्यासह हायवा मालकाविरुद्ध कारवाई करण्यात आली.

पोलिसांच्या माहितीनुसार, दोन्ही आरोपी विनापरवाना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मुरूमाची चोरटी वाहतूक करताना आढळून आले.

या दोन्ही प्रकरणांत कलम ३०३(२) BNS सह ४८(७)(८) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असून, दोन्ही कारवायांमध्ये मिळून ७० लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई LCBचे API जयभाये, PSI चंदन परिहार, दीपक मुदिराज, काळे, पोह/१२४६ वड, पोह/१२५५ बुकरे, पोह/४५९ जाधव, पोशि/६२० चौरे, पोशि/२०५ नामदेव धोत्रे, पोशि/१२४८ शरद सावंत आणि चालक पोशि/१२३६ सपकाळ यांच्या पथकाने केली.




# उसाला प्रतिटन ५००० रुपये दर द्या

## 'ऊस उत्पादक संघर्ष समिती'चा ओंकार शुगर्सला इशारा

■ पांगरी - अतुल बडे

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार १५ ऑक्टोबरपासून साखर कारखाने सुरू करण्याचे नियोजन सुरू आहे. मात्र, कारखाने सुरू होण्यापूर्वीच उसाचा दर घोषित करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती, बीड आणि युवा शेतकरी संघर्ष समिती यांच्या वतीने पांगरी येथील 'ओंकार शुगर्स प्रा. लि.' प्रशासनाला देण्यात आला आहे.

यासंदर्भात समितीच्या प्रतिनिधींनी ओंकार शुगरच्या चे अरमन व व्यवस्थापकांना निवेदन सादर करून आपल्या विविध मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. कारखाना सुरू करण्यापूर्वी दर जाहीर करण्याची मागणी निवेदनात नमूद केल्यानुसार, केंद्र सरकारने साखरेचे दर नियंत्रित ठेवण्यासाठी




सर्व साखर कारखान्यांना १५ ऑक्टोबरपर्यंत गाळप हंगाम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यादृष्टीने कारखान्यांची तयारी सुरू असली तरी कोणत्याही कारखान्याने अद्याप उसाचे भाव जाहीर केलेले नाहीत.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# कारला रोडवरील श्री चिंतामणी संस्थान भक्तांच्या श्रद्धेचे जागृत देवस्थान

## स्वयंभू श्री चिंतामणी गणरायाच्या चरणी भक्तांची श्रद्धेची मांदियाळी

**महागाव | प्रतिनिधी**

पुसद शहराच्या कारला रोड परिसरातील श्री चिंतामणी संस्थान हे श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचे एक सुंदर केंद्र म्हणून भाविकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करून आहे. स्वयंभू व नवसाला पावणारा गणपती म्हणून श्री चिंतामणी गणरायाची ख्याती केवळ पुसदपुरती मर्यादित न राहता संपूर्ण विदर्भात पोहोचली आहे.

सन १९८० च्या सुमारास कारला रोडलगत असलेल्या एका लिंबाच्या वृक्षाखाली श्री चिंतामणी गणरायाची स्वयंभू मूर्ती भक्तांना आढळून आली. या प्रकट मूर्तीची वार्ता परिसरात वाऱ्यासारखी पसरली आणि दर्शनासाठी भाविकांची गर्दी होऊ लागली. श्रद्धेने ओथंबलेल्या भक्तांनी त्याच ठिकाणी मूर्तीची स्थापना करून पूजा-अर्चना सुरू केली.

कालांतराने "नवसाला पावणारा चिंतामणी" अशी या जागृत देवस्थानाची भक्तांमध्ये श्रद्धा निर्माण झाली.

या पवित्र स्थळाचे महत्त्व वाढत गेल्याने सन २००९ मध्ये श्री चिंतामणी संस्थानच्या वतीने भव्य मंदिराचे बांधकाम करण्यात आले.

संस्थानचे अध्यक्ष श्री. साहेबराव पारध, कोषाध्यक्ष श्री. संजय भंडारी तसेच संस्थानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन मंदिर उभारणीचे कार्य पूर्ण केले. मंदिराचे प्रशासनीक कार्य उत्कृष्टरित्या पदाधिकाऱ्याकडून केले जाते.

स्वयंभू श्री चिंतामणी गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली आणि या देवस्थानाला अधिक सुंदर व धार्मिक स्वरूप प्राप्त झाले.

मंदिराच्या उभारणीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे पुण्यकार्य श्री. कुकडे यांनी केले. त्यांच्या योगदानामुळे आज या ठिकाणी भाविकांसाठी एक सुंदर आणि प्रसन्न आध्यात्मिक परिसर निर्माण झाला आहे. मंदिराच्या परिसरात सध्या अतिशय देखणी परसबाग तयार करण्यात आली असून, निसर्गरम्य वातावरणामुळे मंदिरात प्रवेश करताच मनाला प्रसन्नता व शांततेचा अनुभव येतो.






या देवस्थानातील धार्मिक विधी, पूजा तसेच सकाळ-संध्याकाळची आरती भक्तिभावाने पार पाडण्याचे कार्य मंदिराचे पुजारी श्री. शाम जोशी गुरुजी करीत आहेत.

मंदिराची सुरक्षा व व्यवस्था जपण्यामध्ये श्री. रमेश सुरोशे (मामा) व श्री. शिवणकर यांचेही मोलाचे योगदान आहे.

दर संकष्टी चतुर्थीला श्री चिंतामणीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. दर्शनाबरोबरच भक्तांना प्रसादरूपाने चहा व उसळ वाटप करण्यात येते. त्यामुळे संकष्टीच्या दिवशी मंदिर परिसरात भक्ती, सेवा आणि प्रसादाचा सुंदर संगम अनुभवायला मिळतो.

अशा या पवित्र श्री चिंतामणी संस्थानाला भेट देणाऱ्या प्रत्येक भाविकाला भक्ती, समाधान आणि सकारात्मक ऊर्जेचा अनुभव येतो.

माघ शु.गणेश जयंतीच्या निमित्ताने मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पूजा-अर्चना, आरती, धार्मिक विधी आणि अन्य कार्यक्रमांनंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. या उत्सवाच्या काळात परिसर भक्तिरसात न्हाऊन निघतो.

श्री चिंतामणी मंदिर म्हणजे केवळ एक देवस्थान नव्हे, तर श्रद्धा, सेवा, संस्कार आणि भक्तीची अखंड ज्योत तेवत ठेवणारे पवित्र स्थान आहे. संकटसमयी गणरायाच्या चरणी मनोभावे प्रार्थना करणाऱ्या भक्तांना मानसिक आधार व समाधान मिळते. मनोकामना पूर्ण करणारा आणि भक्तांच्या हाकेला धावून येणारा "जागृत चिंतामणी" म्हणून या देवस्थानाची भक्तांच्या हृदयात अढळ श्रद्धा आहे.

- **"गणरायाच्या चरणी ठेवावा विश्वास,**
- **चिंतामणी दूर करी भक्तांचा त्रास;**
- **श्रद्धेने जो येई या पावन द्वारी,**
- **कृपाछाया लाभे त्यावरी गणरायाची न्यारी..."**

अशा या पवित्र श्री चिंतामणी संस्थानाला भेट देणाऱ्या प्रत्येक भाविकाला भक्ती, समाधान आणि सकारात्मक ऊर्जेचा अनुभव येतो. पुसदच्या धार्मिक व सांस्कृतिक वैभवात भर घालणारे हे देवस्थान भविष्यातही श्रद्धेचे आणि सेवाभावाचे प्रेरणास्थान ठरावे, हीच श्री चिंतामणी गणरायाच्या चरणी प्रार्थना.

# लोकसंवाद मोहिमेअंतर्गत बीड शहरात स्पर्धा परीक्षा, पोलीस भरती व सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन

**बीड** | माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरात 'लोकसंवाद' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून बीड शहरातील आदर्श गणेश मंडळ (आदर्श नगर), हिंदवी स्वराज्य सार्वजनिक उत्सव समिती (श्रीराम नगर रोड) आणि ज्ञानज्योत गणेश मंडळ (चराटा फाटा) येथे मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी उपस्थित नागरिक, तरुण वर्ग आणि विशेषतः विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.




मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून कठोर परिश्रम करण्याचे आवाहन केले. स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, वेळेचे नियोजन कसे असावे आणि यशासाठी सकारात्मक दृष्टिकोन कसा ठेवावा, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाच्या टिप्स दिल्या. तसेच पोलीस दलात दाखल होऊन देशसेवेची इच्छा बाळगणाऱ्या तरुणांसाठी पोलीस भरतीच्या तयारीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यादरम्यान शारीरिक क्षमता चाचणीसोबतच लेखी परीक्षेसाठीचा नियमित सराव किती महत्त्वाचा आहे, हे त्यांनी स्पष्ट केले.

आजच्या डिजिटल युगात वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांवर विशेष भर देत त्यांनी उपस्थितांना सावध केले. ऑनलाईन फ्रॉड, लॉटरीच्या नावाखाली येणारे बनावट मेसेज, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि स्वतःची गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तींसोबत शेअर न करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे महत्त्व त्यांनी उपस्थितांना पटवून दिले. गणेशोत्सवाच्या पवित्र वातावरणात धार्मिक कार्यक्रमांसोबतच अशा प्रकारच्या प्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल नागरिक व युवकांनी पोलीस प्रशासन आणि जिल्हा माहिती कार्यालयाचे आभार मानले.

# उद्योगाच्या शिखरावर भरत गित्ते तरीही मित्रांसाठी आजही तोच वर्गमित्र!

## 'अल्युमिनियम मॅन' भरत गित्ते यांची प्रा. पवन मुंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



**परळी** | उद्योगविश्वात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत मोठी व्यावसायिक उंची गाठलेले राज्यातील प्रसिद्ध उद्योगपती तथा 'अल्युमिनियम मॅन' तौरल इंडिया चे संस्थापक श्री. भरत गित्ते यांनी परळी न. प.चे बांधकाम सभापती तथा वर्गमित्र प्रा. पवन मुंडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी प्रा. पवन मुंडे यांनी आपल्या वर्गमित्राचे यथोचित सन्मान करून मनःपूर्वक स्वागत केले. भरत गित्ते आणि प्रा. पवन मुंडे हे वर्गमित्र असल्याने या भेटीला जुन्या मैत्रीच्या आठवणींनी भारलेला स्नेहमेळाव्याचा रंग लाभला.

माणूस आयुष्यात कितीही मोठ्या उंचीवर पोहोचला, कितीही यश मिळवले तरी आपल्या शाळकरी मित्रांसोबत मनमोकळ्या गप्पा मारण्याचा आनंद काही वेगळाच असतो. याच भावनेचा सुंदर अनुभव या भेटीदरम्यान आला. उद्योगविश्वातील जबाबदाऱ्या आणि व्यस्त जीवन मागे ठेवत भरत गित्ते यांनी वर्गमित्रांसोबत मनमोकळ्या गप्पा मारल्या. जुन्या आठवणींना उजाळा देताना हास्यविनोदाने वातावरणही प्रसन्न झाले.

आज भरत गित्ते यांनी उद्योग क्षेत्रात मोठे नाव कमावले असले तरी मित्रांच्या मैफिलीत त्यांच्यातील 'मोठा उद्योगपती' दिसत नाही, तर वर्षानुवर्षांपूर्वीचा तोच आपला वर्गमित्र दिसतो, हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खासियत असल्याची भावना मित्रांनी व्यक्त केली. कोणताही बडेजाव नाही, मोठेपणाचा आव नाही; उलट प्रत्येक मित्राशी तितक्याच आपुलकीने संवाद साधणारा भरत हा सर्व वर्गमित्रांना जोडणारा दुवा असल्याचे यावेळी प्रकर्षाने जाणवले.

यावेळी परळी नगर परिषदेचे बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल भरत गित्ते यांचा यथोचित सन्मान करून त्यांना शुभेच्छा दिल्या. शाळेपासून जपलेली मैत्री आणि आज प्रत्येकाने आपापल्या क्षेत्रात मिळवलेले यश यामुळे या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजारांची मदत द्या : शेकापचा केज तहसीलवर बैलगाडी मोर्चा

## मागण्या मान्य न झाल्यास चक्काजाम आंदोलनाचा भाई मोहन गुंड यांचा इशारा



**केज : प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, शासनाने तातडीने ठोस मदत जाहीर करावी, या प्रमुख मागणीसह विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने सोमवारी, दि. २१ सप्टेंबर रोजी केज तहसील कार्यालयावर भव्य बैलगाडी मोर्चा काढण्यात आला.


आंबेडकर चौक येथून वाजतगाजत आणि शासनविरोधी घोषणा देत हा मोर्चा तहसील कार्यालयाकडे रवाना झाला. भाई मोहन गुंड यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात परिसरातील शेतकरी बैलगाड्यांसह मोठ्या संख्येने सहभागी झाले.

पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून उत्पादन खर्चही भरून निघण्याची परिस्थिती नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. त्यातच सन २०२५ च्या खरीप आणि रब्बी हंगामाचा पीकविमा अद्याप प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. शासनाच्या घोषणा प्रत्यक्ष मदतीत कधी रूपांतरित होणार, असा सवाल यावेळी आंदोलकांनी उपस्थित केला.

मोर्चादरम्यान करपलेल्या पिकांची होळी करून शासनाच्या शेतकरी धोरणांविरोधात संताप व्यक्त करण्यात आला. शेतकऱ्यांना तातडीने दुष्काळी मदत, प्रलंबित पीकविमा, पुरेसा वीजपुरवठा आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

### प्रमुख मागण्या

1. बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची मदत द्यावी.2. जनावरांसाठी तात्काळ चारा उपलब्ध करून द्यावा.3. सन २०२५ च्या खरीप व रब्बी हंगामाचा प्रलंबित पीकविमा तातडीने वितरित करावा.4. शेतीपंपांचे तसेच घरगुती वीज बिल संपूर्ण माफ करावे.5. शेतीपंपांसाठी किमान ८ तास अखंड वीजपुरवठा करावा.6. शेतकऱ्यांवर स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ बंद करावी.7. बीड जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी उसाचा दुसरा हप्ता तातडीने अदा करावा.8. केज शहरातील शेतकऱ्यांनाही ग्रामीण कृषी योजनांचा लाभ द्यावा. या प्रमुख मागणीसाठी मोर्चा होता, यावेळी हनुमंत भोसले, डॉ हनुमंत सौदागर,प्रकाश भन्साळी, राहुल खोडसे, राष्टपाल पाटुळे, अक्षय भुंबे या वेळी शेकाप महिला आघाडीच्या शिवकन्या गुंड सविता आकुसकर, शेकापचे भाई अशोक रोडे शंभुराजे पाटील, ॲड निखिल बचुटे हभप अशोक महाराज, मंगेश देशमुख, महेश गायकवाड बालु भासले, दिगंबर मगर,धनराज भासले दिनकर बप्पा कदम, अनिल नखाते, विनोद आगलावे, किशोर सुरवसे, मुस्तक शेख, गोविंद गुंड, दादा हास्वले बाबुराव जाधव दिगाबर गुंड महिला यांनी मोर्चा यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.



**अष्टविनायक म्हणजे महाराष्ट्रातील आठ मानाची व प्रतिष्ठेची गणपतीची देवळे आहेत**
पश्चिम महाराष्ट्र व कोकणात असलेल्या ह्या देवळांना स्वतंत्र इतिहास आहे. या सर्व देवळांना पेशव्यांचा आश्रय असल्यामुळे त्यांना पेशवाईच्या काळात महत्त्व प्राप्त झाले. मुद्गल पुराणातही अष्टविनायकांचे वर्णन आढळते. महाराष्ट्रातील या विशिष्ट 'आठ' ठिकाणच्या गणेश मंदिरांना, मूर्तींना खास महत्त्व आहे. या आठ मंदिरांस मिळून 'अष्टविनायक' म्हणले जाते. अष्टविनायकांची मंदिरे (स्थळे) महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत.

**गणपती ही विद्येची देवता असून तो, सुखकर्ता, दुःखहर्ता आणि रक्षणकर्ता आहे अशी गणेश भक्तांची भावना आहे.**



श्री गणेशाच्या अनेक प्रतिमा (मूर्ती) तयार केल्या गेल्या परंतु दगडावर कोरीवकाम करून निर्माण केलेल्या प्राचीन मूर्तींचा शोध ज्या ठिकाणी लागला, तसेच जेथे 'स्वयंभू' प्राचीनतम मूर्ती सापडल्या अशा स्थळांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. याच मंदिरांना अष्टविनायकांची मंदिरे समजले जाते. महाराष्ट्रातील असंख्य भाविक अष्टविनायकाची यात्रा करतात. अष्टविनायकाची सर्व मंदिरे ही अंतराच्या दृष्टीने परस्परांच्या जवळ आहेत. साधारणपणे दीड ते दोन दिवसांत ही अष्टविनायक यात्रा पूर्ण होऊ शकते. पुणे जिल्ह्यात पाच (मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री), रायगड जिल्ह्यात दोन (महड, पाली) व अहमदनगर जिल्ह्यात एक (सिद्धटेक) या ठिकाणी 'अष्टविनायक स्थाने' आहेत. या गणपतींपैकी महड, सिद्धटेक व रांजणगावचा गणपती हे उजव्या सोंडेचे आहेत. बाकीचे डाव्या सोंडेचे. या सर्व गणपतींची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे -

## लेण्याद्रीचा गिरिजात्मज

अष्टविनायकापैकी सहावा गणपती लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज. किल्ले शिवनेरीच्या सान्निध्यात, जुन्नर तालुक्यातील प्राचीन जुन्नर लेण्यांच्या समुदायात आणि कुकडी नदीच्या परिसरात डोंगरावर श्री गिरिजात्मज गणेशाचे हे स्वयंभू स्थान आहे. श्री गणेशाची प्रसन्न मूर्ती असून ती दगडामध्ये कोरलेली आहे. मंदिर परिसरातील खडकामध्ये कोरीवकाम, खोदकाम केलेले आहे. पेशवे काळात या मंदिराचा जीर्णोद्धार झाला होता. मंदिरात दगडी खांब आहेत व त्यावर वाघ, सिंह, हत्ती असे सुंदर नक्षीकाम केलेले आहे. मंदिरात जाण्यासाठी डोंगरावर सुमारे ४०० पायऱ्या आहेत
लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज हा जुन्नरपासून ७ कि.मी. अंतरावर आहे, तर पुण्यापासून सुमारे ९७ कि. मी. अंतरावर हे ठिकाण आहे.



दैनिक अतुल्य महाराष्ट्र
बीड, मंगळवार, 22 सप्टेंबर 2026



# स्व.सुवालालजी वाकेकर सामाजिक प्रतिष्ठान व मराठवाडा साहित्य परिषदेच्या पुरस्कारांचे थाटात वितरण

## ज्या समाजात साहित्यक, उद्योजक व शिक्षकांचा सन्मान होतो तो समाज खऱ्या अर्थाने संवेदनशील समाज राहतो - समाजकल्याण आयुक्त दिपाताई मुधोळ-मुंडे

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

स्व.समाजभूषण सुवालालजी वाकेकर सामाजिक प्रतिष्ठान आणि मराठवाडा साहित्य परिषद, परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'साहित्य सेवागौरव,उद्योगरत्न व आदर्श शिक्षक पुरस्कार' सोहळा रविवार,दि. २० सप्टेंबर रोजी वैद्यनाथ कॉलेजच्या सभागृहात उत्साहात संपन्न झाला.यावेळी सभागृहास संबोधित करताना समाजकल्याण आयुक्त दिपाताई मुधोळ-मुंडे बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष विजयसेठ वाकेकर होते.पुणे येथील समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ - मुंडे यांच्या शुभहस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. मराठवाडा शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष पी. एस. घाडगे गुरुजी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी तौरल इंडिया प्रा. लि.चे संचालक भारत केशवराव गित्ते यांना 'उद्योगरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला.तसेच सेवानिवृत्त मुख्याध्यापक शंकर जयवंतराव मामीलवाड यांचाही शैक्षणिक सेवेसाठी सेवागौरव करण्यात आला.

केज येथील साने गुरुजी निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ.कविता गित्ते यांना शासनाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' देऊन विविध शिक्षकांचा गौरव करण्यात आला.पुरस्कारार्थींमध्ये अंजली रेणुका वसंतराव कुलकर्णी,शशिकला नरसोबा फुंदे,मनीषा गुलाबराव सरवदे, प्रियतमा विष्णू कराड, प्राजक्ता चंद्रशेखर खानापुरे, संदिपान रामभाऊ फड, श्रीकांत जनार्दन बोबडे,हरी बाबुराव केंद्रे,मिलिंद राणोजी साळवे,निवृत्ती नामदेव येवले आणि सय्यद आमेर सय्यद जमील यांचा समावेश होता.

कार्यक्रमास साहित्यिक, शिक्षक,सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणप्रेमी व नागरिकांची उपस्थिती होती.साहित्य, उद्योग आणि शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा





गौरव करून त्यांच्या कार्याची दखल घेण्याचे काम या पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून करण्यात आले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

रोजगारनिर्मिती करणे हे आमच्या उद्योगाचे ध्येय आहे. समाज व राष्ट्र स्वावलंबी बनण्यात उद्योगाचा महत्त्वपूर्ण वाटा असतो.त्यात मी माझ्या पद्धतीने माझी भूमिका पार पाडतो आहे.मला उद्योगरत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले.हे माझे भाग्य.कारण मातीतला पुरस्कार हा दुसऱ्या कितीतरी मोठ्या पुरस्कारापेक्षा मोठा असतो ही भावना यावेळी ॲल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळख असलेले भरत गीते यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली.तर 'ज्या समाजात साहित्यिकाचा ,उद्योजकांचा , व शिक्षकांचा सन्मान होतो. तो समाज खऱ्या अर्थाने संवेदनशील समाज राहतो.असे मत समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ मुंडे मॅडम यांनी मांडले.शिक्षकाने राष्ट्राच्या उभारणीमध्ये आतापर्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे अगदी तशीच भूमिका यापुढेही पार पाडावी असेही त्यांनी यावेळी आपले मत मांडले. मराठवाडा साहित्य परिषद ही एक गतिमान शाखा आहे असे गौरवोद्गार यावेळी प्रमुख पाहुणे पी.एस.घाडगे गुरुजी यांनी काढले.अध्यक्षीय समारोपात समाजभूषण स्व. सुवालालजी वाकेकर यांच्या विचाराचा वारसा पुढे चालवत मराठवाडा साहित्य परिषदेच्या माध्यमातून विविध उपक्रम आम्ही सातत्याने घेत राहू अशी भूमिका विजयशेठ वाकेकर यांनी मांडली.सत्काराला उत्तर म्हणून सौ.अंजली कुलकर्णी व डॉ कविता गित्ते यांचीही यावेळी मनोगते संपन्न झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड यांनी तर सूत्रसंचालन कवी अनंत मुंडे व आभार प्रकटन बंडू अघाव यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठवाडा साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष प्राचार्य अरुण पवार ,दिवाकर जोशी ,प्राचार्य रमेश राठोड,सिद्धेश्वर इंगोले,बालाजी कांबळे, डॉ.राजाभाऊ धायगुडे ,महेश होनमाने ,दीपकशेठ वाकेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मामांच्या स्मृतींना आंब्याच्या वृक्षारोपणातून उजाळा; पत्रकार किरण जावळे यांचा सामाजिक उपक्रम

## बुद्धवासी श्रीकांत गजघाट यांच्या स्मरणार्थ नांदा येथे आंब्याचे झाड लावले; जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप

**आष्टी | प्रतिनिधी**

नांदा येथील बुद्धवासी श्रीकांत आनंदराव गजघाट यांच्या स्मरणार्थ त्यांचे भाचे तथा पत्रकार किरण जावळे यांनी आंब्याचे झाड लावून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप केले. मामांच्या आठवणी जपताना सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम राबविण्यात आला. दिवंगत व्यक्तीच्या स्मृतींना समाजोपयोगी कार्याची जोड देत पत्रकार किरण जावळे यांनी आपल्या मामांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

बुद्धवासी श्रीकांत गजघाट यांच्या निधनामुळे गजघाट कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखद प्रसंगात आपल्या मामांच्या स्मृती चिरंतन जपण्यासाठी त्यांचे भाचे पत्रकार किरण जावळे यांनी आंब्याचे झाड लावण्यासह विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्याचा उपक्रम हाती घेतला. दिवंगत व्यक्तीच्या आठवणी केवळ मनात न ठेवता समाजासाठी उपयुक्त ठरणाऱ्या कार्यातून जिवंत ठेवता येतात, हा विचार या उपक्रमातून व्यक्त झाला.

आंब्याचे झाड लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

बुद्धवासी श्रीकांत आनंदराव गजघाट यांच्या स्मरणार्थ पत्रकार किरण जावळे यांनी आंब्याचे झाड लावले. सध्याच्या काळात पर्यावरणाचा समतोल राखणे, वृक्षांचे संवर्धन करणे आणि भावी पिढ्यांसाठी निसर्गाचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. आंब्याच्या झाडाच्या लागवडीतून पर्यावरण रक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

आंब्याचे झाड हे भविष्यात सावली आणि फळे देणारे वृक्ष म्हणून महत्त्वाचे आहे. त्याचे योग्य संगोपन केल्यास ते अनेक वर्षे पर्यावरणाला योगदान देऊ शकते. लावलेले झाड भविष्यात मोठे होऊन अनेकांना सावली देईल आणि निसर्ग संवर्धनासाठी हातभार लावेल. त्यामुळे दिवंगत मामांच्या स्मरणार्थ केलेली आंब्याच्या झाडाची लागवड हा भावनिक जिव्हाळा आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम ठरला.

### ■ जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप

आंब्याचे झाड लावण्यासोबतच नांदा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले. बुद्धवासी श्रीकांत गजघाट यांच्या स्मरणार्थ आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या आनंदात सहभागी होण्याचा प्रयत्न करण्यात आला.

लहान मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे आणि त्यांच्या आनंदात सहभागी होणे, हीच या उपक्रमामागील





भावना होती. विद्यार्थ्यांना खाऊवाटप करून पत्रकार किरण जावळे यांनी सामाजिक जिव्हाळ्याची भावना व्यक्त केली. अशा उपक्रमांमुळे शाळा आणि समाज यांच्यातील नाते अधिक दृढ होण्यास मदत होते.

विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यांच्या आनंदासाठी, प्रोत्साहनासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सकारात्मक योगदान देणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्याचा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

### ■ मामांच्या आठवणींना सामाजिक कार्याची जोड

जवळच्या व्यक्तीच्या निधनानंतर निर्माण होणारी पोकळी कधीही भरून निघत नाही. मात्र, त्या व्यक्तीच्या स्मृती जपताना समाजासाठी काहीतरी चांगले कार्य करण्याचा प्रयत्न सकारात्मक प्रेरणा देऊ शकतो. बुद्धवासी श्रीकांत गजघाट यांच्या स्मरणार्थ पत्रकार किरण जावळे यांनी केलेला उपक्रम याच भावनेतून राबविण्यात आला.


आंब्याचे झाड लावून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला, तर विद्यार्थ्यांना खाऊवाटप करून त्यांच्या आनंदात सहभागी होण्यात आले. या दोन्ही उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी, निसर्गप्रेम आणि विद्यार्थ्यांप्रती असलेला जिव्हाळा अधोरेखित झाला.

### ■ समाजोपयोगी उपक्रमातून भावपूर्ण आदरांजली


दिवंगत व्यक्तीच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित कार्यक्रम समाजाच्या हिताचा ठरला, तर त्या कार्याला अधिक अर्थ प्राप्त होतो. नांदा येथे बुद्धवासी श्रीकांत आनंदराव गजघाट यांच्या स्मरणार्थ त्यांचे भाचे तथा पत्रकार किरण जावळे यांनी आंब्याचे झाड लावून आणि विद्यार्थ्यांना खाऊवाटप करून आपल्या भावना व्यक्त केल्या.

मामांच्या आठवणी जपत पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थ्यांच्या आनंदासाठी केलेला हा प्रयत्न सामाजिक जाणीवेचा संदेश देणारा ठरला. दिवंगत श्रीकांत गजघाट यांच्या स्मृतींना अशा समाजोपयोगी कार्यातून अभिवादन करण्यात आले.

बुद्धवासी श्रीकांत आनंदराव गजघाट यांच्या स्मरणार्थ भाचे तथा पत्रकार किरण जावळे यांनी आंब्याचे झाड लावून आणि विद्यार्थ्यांना खाऊवाटप करून राबविलेला हा उपक्रम नांदा परिसरात सामाजिक बांधिलकी व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा ठरला.







**खामगाव येथे खांबेश्वर गणेश मित्र मंडळाच्या गणपतीची आरती संपन्न : खामगाव येथे सिरसाळा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी बी. बी. राठोड साहेब यांच्या शुभहस्ते खांबेश्वर गणेश मित्र मंडळाच्या गणपतीची आरती करण्यात आली. यावेळी गणेश भक्तांसह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. भक्तिमय वातावरणात आरती संपन्न झाली.**